# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१) ५२७२ (१०-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण गावावर जुलै, २०१४ च्या दरम्यान काळाने झडप घातलेल्या गावांचे कायमस्वरुपी पुनर्वसनाचा निधी न मिळाल्यामुळे माळीणचे पुनर्वसन रखडल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळीणच्या कामयमस्वरुपी पुनर्वसन निधी उपलब्ध करुन देऊन माळीण गावाचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०५-२०१५)** :(१) हे खरे आहे.

(२) आदिवासी विकास विभागाकडून निधी उपलब्ध न झाल्याने महसूल व वन विभागामार्फत निधी उपलब्धतेबाबत दिनांक ३१/०३/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**भोर (जि.पुणे) येथील अवजड वाहनांचा बंद केलेला परवाना पूर्ववत सुरु करणेबाबत.**

**(२) ५२९७ (०७-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) येथील अवजड वाहनांचा बंद केलेला परवाना व वाहनांचे नूतनीकरण पूर्ववत सुरु करणे कामी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ मे, २०१४ व दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) या विषयासंदर्भात लोकप्रतिनिधीनी माहे जुलै व ऑगस्ट २०१४ मध्ये पाठविलेली निवेदने पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

(२) शिबीर कार्यालयाच्या ठिकाणी फक्त हलक्या वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रांचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

परिवहन संवर्गातील मध्ये व अवजड वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासंबंधिचे कामकाज आळंदी रोड कार्यालय, पुणे येथे करण्यात येत आहे.

पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या पाच जिल्ह्यातील अवजड वाहनांच्या परवान्यासंबंधी चालक चाचणीचे कामकाज एस.टी. महामंडळाच्या मध्यवर्ती प्रशिक्षणसंस्था, भोसरी येथील चाचणी पथावर घेण्यात येत होते. तथापि, तांत्रिक अडचणीमुळे चाचणी पथ बंद करावा लागल्याने सद्य:स्थितीत पुणे कार्यालयातील उमेदवाराची सदर चाचणी आळंदी रोड कार्यालय, पुणे येथे घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावली परिसरातील हजारो प्रवाशांना नागपूरच्या प्रवासापासून वंचित केले असल्याबाबत**

**(३) ५४८८ (०४-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत तालूका मुख्यालय असलेल्या मुख्य बाजारपेठ असलेल्या सावली गावातून पुर्वी गडचिरोली व्हाया सावली नागपूर आणि नागपूर व्हाया सावली गडचिरोली या एस.टी.बसेस पुर्वी दररोज सकाळी ६.३०, ८.३०, १०.३०, दुपारी १२.३०, १.३०, ४.३०, सायंकाळी ६.००, रात्रौ १०.०० वाजता ये-जा करीत होते, परंतू अचानक सावलीमध्ये प्रवासी मिळत

नसल्याचे कारण सांगून या सर्व एस.टी. बसेस महामंडळाने बंद करुन सावली परिसरातील हजारो प्रवाशांना नागपूरच्या प्रवासापासून वंचित केले असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावली वरुन नागपूर आणि नागपूर वरुन सावली एस.टी. बसेस पुन्हा सुरु करण्यासाठी व्यापारी मंडळ, नागरीक अनेक वेळा आंदोलन करुन लेखी निवेदनाद्वारे तसेच लोकप्रतिनिधींनी सुध्दा वेळोवेळी मागणी करुन सुध्दा एस.टी. महामंडळांनी अद्यापही एकही एस.टी बसेस सुरु केलेली नसल्यामुळे नागरीकांत तीव्र असंतोष निर्माण होत असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रिद वाक्य वापरणाऱ्या एस.टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सावली व्हाया मूल नागपूर आणि नागपूर व्हाया मूल सावली या बसेस पूर्वीच्याच वेळेपत्रकानुसार सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०८-२०१५) :**(१) व (२) सावली गावातून नागपूरकरिता गडचिरोली आगारातून १०.३० व दुपारी १६.३० अशा दोन फेऱ्या चालविण्यात येत होत्या. या फेऱ्यांना प्रवासी प्रतिसाद नसल्यामुळे व कमी उत्पन्नामुळे सन २००४ पासून बंद केल्या आहेत. परंतु सावली गावालगत १२ कि.मी. अंतरावर असलेल्या मूल या मुख्य बसस्थानकावरुन मूल ते नागपूरकरिता ०७.१५, ०८.१५, ११.४५ व १४.४५ वाजताच्या फेऱ्या सुरु आहेत. तसेच सावली ते मूलकरिता दर १५ मिनिटांनी फेऱ्या उपलब्ध आहेत.
(३) सावली येथून नागपूर मार्गे मूल फेरी पुर्वीच्या वेळापत्रकानुसार सुरु करण्याऐवजी सावली येथून ०९.४५ व १७.४५ वाजता अशा दोन फेऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन सुरु करण्याबाबतची बाब कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्तांसाठी केंद्र शासनाकडून अद्याप आर्थिक मदत न मिळाल्याबाबत**

**(४) ५५५९ (०४-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळग्रस्तांसाठी केंद्र शासनाकडून अद्याप आर्थिक मदत न मिळाल्याने शासनाने आकस्मिकता निधीतून दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे हे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दुष्काळग्रस्ताच्या मदतीसाठी केंद्र सरकारकडे कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) केंद्र सरकारकडे मदतीसाठी जे ज्ञापन पाठविण्यात आले होते त्यानुषंगाने केंद्र शासनाकडून राज्याला रु.१९६२.९९ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत देण्याबाबत

**(५) ५७८४ (०४-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाकडून राज्यातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना ३ हजार ९२५ कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी करण्यात आली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतक-यांना विशेष पॅकेज देण्याची घोषणा झाली तरी अद्याप शासन निर्णय झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती विभागातील १९ लाख ९४ हजार ६७२ दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत मिळालेली नसल्याचे ही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने घोषणा केल्याप्रमाणे दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१५)** :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
दि.७ जानेवारी, २०१५ व दि.२ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयांन्वये एकूण रु.४ हजार कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) व (४) अमरावती विभागाला १००२.७९ कोटी निधी उपलबध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी १७,९२,३३८ शेतक-यांच्या बँक खात्यात रु.९२८.३२ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात उत्पादक शुल्क खात्याने नंदुरबार येथील रेल्वे उड्डाणपुलाखाली नकली दारुच्या विदेशी ब्रॅण्डच्या बाटल्या जप्त केल्याबाबत

**(६) ५८१३ (०८-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्पादक शुल्क खात्याने नंदुरबार येथील रेल्वे उडडाणपुलाखाली सापळा रचून नकली दारुच्या विदेशी ब्रॅण्डच्या बाटल्या दिनांक १५ जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास जप्त केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, चौकशी अंती नकली दारुची विक्रि केल्याबाबत मालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०५-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) नकली दारुची विक्री करणारा वाहन मालक यांचे विरुध्द महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम चे कलम ६५ (अ)(इ), ८३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

---

### दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत न करता जाहिरातीसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्याबाबत

**(७) ६०४८ (०४-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदतीसाठी दयायला पैसे नाहीत शासनाच्या तिजोरीत खडखडाट आहे असे सांगणारे शासनाने नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ या कालावधीत जाहिरातीवर १६ कोटी ७३ लक्ष रूपये १२ जानेवारी, २०१५ रोजी मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) अवकाळी पावसाने तसेच दुष्काळामुळे उध्वस्त झालेल्या शेतक-यांना मदत न करता जाहिरातीसाठी कोटयवधी रूपये खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंबंधात चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२५-०५-२०१५)** :(१) व (२) अंशत: खरे आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये आपत्ती विषयक जनजागृती आणि क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापना संदर्भात जनजागृती होण्यासाठी एस.टी. बसेस, बस स्थानकातील होर्डिंग्ज आणि सुमारे १७८०० ग्रामपंचायतीच्या भिंतीवर आपत्ती व्यवस्थापन विषयक माहिती नमूद करण्यासाठी रु.५.७५ कोटी खर्च करण्यात आले आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पाऊस व चक्रीवादळ यामुळे ग्रीन हाऊस धारकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(८) ६१६१ (०७-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात असलेले ग्रीन हाऊस राज्य शासनाच्या पुढाकाराने सन २०१२-१३ या वर्षात राबविण्यात आले मात्र त्याचवर्षी झालेला पाऊस व चक्रीवादळ यामुळे ग्रीन हाऊस धारकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) तसेच ग्रीन हाउस हा विषय राज्य पिक विमा योजनेत समाविष्ट नसल्याने सातारा जिल्हयातील ग्रीन हाऊस धारकांना नुकसानीचे पैसे मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सन २०१२-१३ या वर्षात नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना नुकसानीची मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय. सन २०१२-१३ या वर्षामध्ये सातारा जिल्हयात पाऊस व चक्रीवादळ यामुळे कोणत्याही ग्रीन हाऊसचे नुकसान झालेले नाही.
(३) होय.
(४) सन २०१२-१३ या वर्षात पाऊस व चक्रीवादळ यामुळे नुकसान झालेल्या हरीतगृहासाठी नुकसानग्रस्तांना एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत मदत अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील पन्हाळा, राधानगरी, गारगोटी या मार्गावर नियमाबाहय टेम्पो-ट्रॅक्स, जीप-कंमाडर इत्यादी गाडयांमधून प्रवासी वाहतुक होत असल्याची बाब**

**(९) ६४०५ (०४-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील पन्हाळा, राधानगरी, गारगोटी या मार्गावर नियमाबाहय टेम्पो-ट्रॅक्स, जीप-कंमाडर इत्यादी गाडयांमधून प्रवासी वाहतुक होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नियमबाहय प्रवासी वाहतुकीला वाहतुक पोलीस व प्रशासन कोणतीच कारवाई करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) व (२) कोल्हापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील वायूवेग पथकामार्फत एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा शोध घेण्याकरीता ४,६३५ वाहने तपासण्यात आली. त्यापैकी दोषी आढळलेल्या ७३७ वाहनांवर आवश्यकतेप्रमाणे परवाना निलंबन/नोंदाणी निलंबन/जप्ती/दंड वसूलीची कारवाई करण्यात आली. तसेच जानेवारी ते मे, २०१५ या कालावधीत वाहतूक पोलिसांमार्फत तपासलेल्या वाहनांपैकी दोषी आढळलेल्या ११६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पथकराच्या सुधारित धोरण तसेच राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमधून वगळण्याबाबत**

**(१०) ६५४५ (१०-०४-२०१५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अजय चौधरी (शिवडी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पथकराच्या (टोल) सुधारित धोरणास शासनाने माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान मंजूरी दिली असून नविन पथकरांच्या सुधारित धोरणाचे स्वरुप काय आहे व याबाबतची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(२) गेल्या १४ वर्षात एसटीचा तोटा बाराशे कोटी रुपयांवर गेला असुन त्यात टोलवर ९८८ कोटी रुपयांचा समावेश आहे, हे खरे आहे काय ;
(३) एसटीला भराव्या लागणा-या करोड रुपयांच्या टोलमुळे तसेच शासनाने जाहीर केलेल्या विविध सवलतीचा परतावा शासनाकडून न मिळल्यामुळे एसटीला होत असलेले तोटा कमी

करण्यासाठी एसटी गाडयास टोल मधुन वगळण्यात यावे तसेच विविध सवलतीमुळे शासनाने देय असलेली करोड रुपयांची थकबाकी त्वरीत मिळावी, म्हणून एसटी महामंडाळाकडून सातत्याने राज्य शासनाकडे करण्यात आलेली आहे काय ;

(४) असल्यास, एसटी गाडयांना टोलमधून वगळण्याच्या दृष्टीने तसेच विविध सवलतीमुळे एसटी महामंडळाची शासनाकडे देय असलेली करोडो रुपयांची थकबाकी विनाविलंब देण्याच्या संदर्भात शासनाने कोणता ठोस निर्णय घेतला आहे.

(५) अद्यापी निर्णय घेतला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०९-२०१५) :**(१) दिनांक ०१ जुलै, २०१४ पासून राज्यातील ४४ पथकर नाके व दिनांक ०१.०६.२०१५ पासून राज्यातील १२ टोल नाके बंद करण्यात आले आहेत. दिनांक ०१.०१.२०१५ पासून सायन-पनवेल मार्गावरील खारघर येथील पथकर नाक्यावरुन राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना वगळण्यात आले आहे. याशिवाय उर्वरित ५३ टोल नाक्यांवर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना वगळण्यात आले आहे.

(२) होय.

सन २०१३-१४ अखेरपर्यंत महामंडळास रु.१२९४.३३ कोटी इतका संचित तोटा आहे. तसेच सन २०१४-१५ च्या सुधारित अंदाज पत्रकानुसार रु.५७४.०० इतकी तोटा अपेक्षित आहे. सन २०००-०१ ते सन २०१४-१५ या कालावधीत एकूण टोल वरील खर्च रु.९२०.७५ कोटी आहे.

(३) होय.

(४) व (५) दिनांक ०१.०४.२०१४ पासून एसटी महामंडळास देय असलेली सवलतमुल्यांची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागाने, वर्षाच्या सुरवातीस महामंडळाकडे आगाऊ जमा करावी दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत देय असलेली प्रलंबित रक्कम रु.१३८६.०० कोटी गृह विभागामार्फत देण्याचे निदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे गृह विभागाने दिनांक ३१.०३.२०१४ अखेर रु.१३८६.०० कोटी सवलत मुल्यांची रक्कम सन २०१४-१५ मध्ये महामंडळास अदा केलेली आहे.

सन २०१४-१५ चे एकूण सवलत मूल्य रु.१३४१.५९ कोटी होते. पंरतु सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पास संबंधित विभागाने तरतुद केली नाही. त्यामुळे सन २०१४-१५ च्या सवलत मुल्यांपोटी महामंडळास आगाऊ प्रतिपूर्ती प्राप्त झाली नाही.

सन २०१४-१५ मधील रु.१३४१.५९ कोटीपैकी १२९.३४ कोटी राज्य परिवहन महामंडळास प्राप्त झाले असून रु.१२१७.२५ कोटी सवलत मुल्य अद्याप येणे आहे. त्याकरीता संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी आणि कर्मचा-यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(११) ६६०५ (०४-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी आणि कर्मचा-यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याने या विभागातील कर्मचारी आणि अधिका-यावर कामाचा अतिरिक्त ताण पडतो

म्हणून सदर अतिरिक्त पदे भरण्याचा निर्णय परिवहन विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किती कालावधीत सदर रिक्त असलेली पदे भरण्यात येणार आहे तसेच मुंबई आणि पुणे या शहरात तंत्रशुध्द वाहन प्रशिक्षण केंद्राचीही उभारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) अद्याप या दोन्ही प्रकरणी निर्णय वा त्याच अंमजबजावणी करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५)** :(१) दि. ३१/०३/२०१५ रोजीच्या आकडेवारीनुसार मोटार वाहन विभागात अधिकारी आणि कर्मचारी यांची मिळून ३१.२० टक्के पदे रिक्त होती. विभागातील रिक्त पदे भरण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.
(२) व (३) मोटार वाहन विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट, पुणे येथे राज्यस्तरीय इन्स्टीट्यूट फॉर ड्रायव्हिंग, ट्रेनिग ॲन्ड रिसर्च या संस्थेची उभारणी करण्यात आली असून ती कार्यान्वयीत करण्यात आली आहे.

---

## कोल्हापूर येथील प्रादेशीक परिवहन कार्यालयात अधिकाऱ्यांची ५ पदे आणि कर्मचाऱ्यांची २५ पदे रिक्त असल्याबाबत

**(१२) ७१४३ (०७-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील प्रादेशीक परिवहन कार्यालयात अधिकाऱ्यांची ५ पदे आणि कर्मचाऱ्यांची २५ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीन भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०७-२०१५)** :(१) होय.
(२) व (३) लघु लेखक (निम्न श्रेणी), मुख्य लिपिक (शहर), कनिष्ठ लेखापरिक्षक / मुख्य लिपिक (ग्रामीण) आणि वरीष्ठ लिपिक या पदोन्नतीसाठी अटी व शर्ती पुर्ण करित नसल्याने सदरची पदे रिक्त आहेत.

सर्व साधारण बदल्या, २०१५ मध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय, कोल्हापूर येथील २ रिक्त पदांवर मोटार वाहन निरिक्षकांची बदलीचे पदस्थापना करण्यात आली आहे. गट-क मधील

पदोन्नतीने भरावयाच्या पदांवरील कोल्हापूर विभागाच्या निवड समितीची बैठक दि. १९/०३/२०१५ रोजी घेण्यात आली असून लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

---

**खोपोली शहारातील (जि.रायगड) उपनगरासह खालापूर, देवन्हावे, साजगाव, आडोशी व पनवेल वाशी मार्गावर धावणाऱ्या बसेसमध्ये महिला कंडक्टरची नेमणूक करण्यात आल्याबाबत**

**(१३) ७२०० (०८-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खोपोली शहारातील (जि.रायगड) उपनगरासह खालापूर, देवन्हावे, साजगाव, आडोशी व पनवेल वाशी मार्गावर धावणाऱ्या बसेसमध्ये महिला कंडक्टरची नेमणूक करण्यात आली असून त्यांना मूलभूत सुविधादेखील पुरविण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणकोणत्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत, व त्या सुविधा तातडीने पुरविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) खालापूर, देवन्हावे, साजगाव, आडोशी व पनवेल, वाशी येथे प्रवाशी निवारा / बस थांबा आहे या ठिकाणी प्रवाशांची चढ-उतार केली जाते. खोपोली बसस्थानक हे कर्जत आगाराच्या कायकक्षेत येत असल्यामुळे कर्जत आगार व पनवेल आगारामध्ये महिला वाहकांसाठी विश्रांतीगृह, प्रसाधनगृहाची स्वंतत्र सोय अशा मुलभूत सुविधा पुरविल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील बदलापूर कल्याण मार्गावरील एस.टी.महामंडळाची सेवा बंद केल्याबाबत**

**(१४) ७२५८ (०४-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील बदलापूर कल्याण मार्गावरील एस.टी.महामंडळाची सेवा बंद केल्याने प्रवाशांचे अतोनात हाल होत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कल्याण बदलापूर मार्गावरील बस सुविधा सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

बदलापूर कल्याण हा मार्ग शहर बस वाहतूकीच्या असून या मार्गावर शहर बस वाहतूक सुरु करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळाने उल्हासनगर महानगरपालिकेस सन २०१० मध्ये "ना हरकत दाखला" दिलेला आहे या मार्गावर बस वाहतूक सुरु करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकेची आहे.

(२) व (३) उल्हासनगर शहर बस वाहतुकीबाबत दिनांक ०७.०४.२०१५ रोजी बैठक आयोजित करुन बैठकीत उल्हासनगर, महानगरपालिका उपक्रमाकडून उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर परिसरातील फेऱ्या या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमांकडून चालविण्याबाबत कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले. त्यानुसार राज्य परिवहन, महामंडळाने दिनांक २५.०६.२०१५ च्या पत्रान्वये बैठकीत दिलेल्या निदेशानुसार उल्हासनगर महापालिका परिवहन उपक्रम सेवेची शहर बस वाहतूक सेवा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेकडून चालविण्याबाबत कळविण्यात आले.

तदनुषंगाने दिनांक २३.०६.२०१५ पासून कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमांकडून वरील मार्गावर बस फेऱ्या सुरु करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई व उपनगरामध्ये सुमारे ३० हजार ऑटोरिक्षा व टॅक्सी बेकायदेशीर असल्याबाबत

**(१५) ७३१० (०८-०४-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरामध्ये सुमारे ३० हजार ऑटोरिक्षा व टॅक्सी बेकायदेशीर असल्याचे ऑटोरिक्षामेन्स युनियने निदर्शनास आणून दिल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर ३० हजार अनाधिकृत ऑटोरिक्षा व टॅक्सी यांचा शोध लावून त्या भंगारात काढणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०८-२०१५) :**(१) मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांत अनधिकृतपणे चालणाऱ्या ऑटोरिक्षांच्या चालकांवर कारवाई करावी, असे निवेदन मुंबई ऑटोरिक्षा-टॅक्सी मेन्स युनियन, मुंबई यांनी एप्रिल, २०१५ मध्ये परिवहन आयुक्त कार्यालयास दिले होते.

(२) व (३) मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांकडील वायुवेग पथक व विशेष तपासणी पथकांद्वारे अनधिकृतपणे चालणाऱ्या रिक्षांचा शोध घेण्याकरीता तपासणी केली जाते. तपासणीत ज्या रिक्षा भंगारात काढण्यात आलेल्या आहेत. परंतु रस्त्यावर अनधिकृतपणे चालताना आढळतात, अशा रिक्षांवर कारवाई केली जाते. प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम/पूर्व) यांचेमार्फत जुलै, २०११ मध्ये १३२, तर फेब्रुवारी, २०१५ मध्ये ६९ भंगारात काढलेल्या रिक्षांचा लिलाव करण्यात आला.

तसेच दि. ०१ जून, २०१५ ते १२ जून, २०१५ या कालावधीत मुंबई व उपनगरांत अवैध ऑटोरिक्षा व टॅक्सीसंदर्भात विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत दोषी आढळलेल्या ३७६० रिक्षांवर व १२७५ टॅक्सींबर आवश्यतेप्रमाणे दंड वसूली/जप्ती/नोंदणी निलंबन/अनुज्ञप्ती निलंबनाची कारवाई करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बोगस टॅक्सी परवाने रद्द केले जाणार असल्याबाबत**

**(१६) ७३६३ (०४-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४० हजार टॅक्सीच्या परवान्यांच्या चौकशीचे आदेश शासनाने दिले असून याचा अहवाल प्राप्त होताच बोगस टॅक्सी परवाने रद्द केले जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टॅक्सीच्या परवान्यांची चौकशी पूर्ण होऊन त्याचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, अहवालात कोणकोणत्या बाबींचा समावेश आहे,
(४) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने माहे फेब्रुवारी, २०१५ अखेर किती टॅक्सीचे परवाने रद्द केले आहेत व अद्यापी किती प्रलंबित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०१-०९-२०१५) :**(१) नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मद्यविक्री धोरणात करण्यात येत असलेल्या बदलाबाबत**

**(१७) ७४५९ (०४-०४-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या सुरु असलेल्या मद्य धोरणात बदल करण्यात येत असून यात किरकोळ मद्य विक्री लिलाव पध्दतीतून करणे व मद्य वितरणासाठी नवीन महामंडळ स्थापन करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर,२०१४ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या धोरणात आवश्यक बदल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, देवकर डिसलेरी यांना सदर विषयासंदर्भात मा.मंत्री महसूल यांना त्यांच्या मागणीचे सविस्तर निवेदन माहे नोव्हेंबर,२०१४ मध्ये दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१३-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) होय.
(४) व (५) देवकर डिस्टीलरी यांनी दिलेल्या निवेदनातील मागण्या शासनाचे विचाराधीन आहेत.

---

**अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी नवीन योजना कार्यान्वयित करण्याबाबत**

**(१८) ७४६७ (०७-०४-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी स्वतंत्र शासकीय पदविका महाविद्यालय तसेच अल्पसंख्यांक बहुल विभागांमध्ये मुलींसाठी शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात येणार असल्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) त्याच बरोबर, आयआयटी मध्ये तिसरी पाळी सुरु करुन या समाजातील मुलांना रोजगारभिमुख शिक्षण देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील दोन्ही अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या असलेल्या योजना त्वरीत कार्यान्वयित करण्यासाठी कोणती उपययोजना करण्यात येत आहे, वा कोणत्या स्वरुपाची,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०८-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे. मुक्ताईनगर, जि.जळगावं येथे अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याबातचा निर्णय दिनांक २०.०५.२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने तेथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यास मान्यता देण्याचा शासन निर्णय दि. ६ जून, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलीसांठी वसतीगृह सुरु करण्याचा शासन निर्णय दि. २ मार्च, २०१० रोजी निर्गमित केला आहे. तसेच राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीवर वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय २० डिसेंबर, २०११ रोजी घेण्यात आला आहे.
(२) नाही.

मांडवी, मुंबई शहर व चांदिवली, मुंबई उपनगर अशा २ नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि विद्यमान ४२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी दुसरी/तिसरी पाळी सुरु करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.२९.८.२००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार तेथे दुसरी/तिसरी पाळी सुरु आहे.

(३) राज्य शासन योजनेअंतर्गत सन २००९-१० पासून आतापर्यंत जागा उपलब्ध झालेल्या एकूण २० ठिकाणी वसतीगृह बांधण्यास मान्यता व निधी देण्यात आला आहे. आतापर्यंत राज्यात ४ ठिकाणी अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतीगृहे सुरु झालेली आहेत. ११ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्रपुरस्कृत बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) राज्यातील परभणी, वाशिम व हिंगोली जिल्हयात मुलींच्या ६ वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर वसतीगृहे जून, २०१५ पासून कार्यान्वित करण्याचे आदेशित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर-कल्याण रोडवरील नेप्ती व निमगाव वाघ**
**शिवारात एस.टी.बसने ५ व्यक्तींना धडक दिल्याबाबत**

**(१९) ७७५५ (०४-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर-कल्याण रोडवरील नेप्ती व निमगाव वाघ शिवारात एस.टी.बसने दिनांक २३ नोव्हेंबर, २०१४ रोजी दुचाकीस्वारांना पाठीमागून जोराची धडक दिल्याने ४ जण जखमी व १ जा जागीच मृत्यूमुखी पडला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी फेर चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, फेर चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, संदर्भाधीन प्रश्नाच्या बाबतीत माहे जानेवारी, २०१५ अखेरपर्यंतच्या कालावधींची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०८-२०१५) :**(१), (२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

दिनांक १३.११.२०१४ रोजी जखणगाव, जि.अहमदनगर येथे मोटारसायकल अपघातामध्ये १ व्यक्ती मृत्य झाल्याचे आढळल्यामुळे नागरिकांनी रास्ता रोको करुन आंदोलन केले होते. आंदोलन कर्त्यांच्या म्हणण्यानुसार दिनांक १२.११.२०१४ रोजी पारनेर आगाराच्या नगर-पारनेर बसने २०.४५ वाजता अपघात केला असल्याने पोलीसांनी बसचालकावर गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हा तपासणीधिन आहे.

सदर अपघाताची राज्य परिवहन महामंडळाद्वारा केलेल्या चौकशीत हा अपघात राज्य परिवहन महामंडळाच्या बसद्वारे झाला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास सन २०१३-१४ आणि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात भरीव वित्तीय भांडवल व विकास निधी उपलबध करुन देण्याबाबत**

**(२०) ७७६५ (०४-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास सन २०१३-१४ आणि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात भरीव वित्तीय भांडवल व विकास निधी उपलबध करुन देण्याबाबतची मागणी विशेषत: अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि माहे ऑगस्ट, २०१४ वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता निर्णय देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१०-०८-२०१५) :**(१) होय.

(२) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे अधिकृत भागभांडवल रु.२५०.०० कोटीवरुन रु.५००.०० कोटी करण्याचा दि. १२ जून, २०१३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

(३) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महामंडळास रु.६०.०० कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु.३२.५० कोटी इतका निधी देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामाकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करण्याबाबत**

**(२१) ७७६८ (०७-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामाकाजोचे संपूर्ण संगणकीकरण करण्याची मागणी अल्पसंख्यांक विकासासंदर्भात कार्य करणाऱ्या विविध जन प्रतिनिधी, सेवाभावी संस्थांनी विशेषत: अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि ऑगस्ट, २०१४ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) नाही.
(२) व (३) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजना व सुक्ष्म पतपुरवठा योजना यासाठीचे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले असून शैक्षणिक कर्ज योजनेबाबतचे सॉफ्टवेअर तयार करण्याचे काम Mahaoline यांच्यामार्फत चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामाकाजाकरिता पूर्णवेळ वित्तीय व लेखा सेवेतील अनुभवी व सक्षम लेखाधिकार्याची तातडीने नियुक्ती करण्याबाबत**

**(२२) ७७६९ (०७-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामाकाजाकरिता पूर्णवेळ वित्तीय व लेखा सेवेतील अनुभवी व सक्षम लेखाधिकार्याची तातडीने नियुक्ती करण्याबाबत अल्पसंख्यांक विकासासंदर्भात कार्य करणाऱ्या विविध जन प्रतिनिधी, सेवाभावी संस्थांनी विशेषत: अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, राज्यमंत्री अल्पसंख्यांक विकास, प्रधान सचिव अल्पसंख्यांक विकास यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि ऑगस्ट, २०१४ वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्रार्थीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता पूर्णवेळ वित्तीय व लेखा सेवेतील अनुभवी व सक्षम लेखाधिकारी मिळणेबाबत वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांना वारंवार विनंती करण्यात आली होती तद्‌नंतर श्रीमती आशा आडकर, लेखाधिकारी- वर्ग-२ या दि.११.०८.२०१४रोजी प्रतिनियुक्तीने रुजू झाल्या होत्या. तद्‌नंतर त्यांना

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या दि.१५.११.२०१४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये प्रत्यावर्तीत करण्यात आले आहे. तद्नंतर पुन्हा लेखाधिकारी प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला राज्यातील प्रत्येक जिल्हयात तसेच उपविभागात अल्पसंख्यांक लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दीष्ट व लक्षांक निश्चित करण्याबाबतची मागणी**

**(२३) ७७७२ (०८-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातर्फे परदेशात शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्यांसाठी शिष्यवृत्तीची मागणी योजनेसाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक जनप्रतिनिधी, तसेच अल्पसख्यांक विकासासंदर्भात कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांनी विशेषतः अल्पसंख्याक जनप्रतिनिधी, समाजाच्या सेवाभावी संस्था यांच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री अल्पसंख्यांक विकास, वित्त व नियोजन मंत्री, यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०११ आणि डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ च्या अनुषंगाने कोणता भरीव निर्णय देण्यात आला वा येत आहे,
(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप व व्याप्ती तसेच प्राथीत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत शिष्यवृत्ती योजना अशी कोणतीही योजना राबविली जात नाही. मात्र महामंडळामार्फत राजीव गांधी शैक्षणिक कर्ज योजना व मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना या दोन योजना राबविल्या जात आहे. शैक्षणिक कर्ज योजनंअंतर्गत वितरीत करण्यात येत आलेली रक्कम ही कर्ज स्वरुपात असून सदर रक्कमेची परतफेड संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर पुढील पाच वर्षाच्या कालावधीमध्ये महामंडळास करणे अनिवार्य आहे. महामंडळाच्या बळकटीकरणाकरिता सन २०११-१२ मध्ये रु.९.३९ कोटी, सन २०१२-१३ मध्ये रु.२८.८० कोटी, सन २०१३-१४ मध्ये ६०.०० कोटी व सन २०१४-१५ मध्ये रु.३२.५० कोटी इतका निधी भागभांडवल स्वरुपात देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहरातील एस.टी. महामंडळाच्या जमिनी रिकाम्या असल्याबाबत**

**(२४) ७८०५ (०७-०४-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरातील एस.टी. महामंडळाच्या जमिनी रिकाम्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) मोक्याच्या ठिकाणी शहरात असलेल्या महामंडळाच्या जमिनीवर समाज कंटकांनी ताबा घेतला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी महामंडळाचे शहर बसस्थानक अथवा व्यापारी संकुल होऊ शकते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी झाली आहे काय, त्यात काय आढळले, दोषींविरुध्द शासनाने काय कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०८-२०१५) :**(१), (२), (३) व (४) रा.प.बसस्थानकाकरता पाणीवेस येथे सुमारे ५३ चौ.मी. प्राप्त महामंडळाने तात्पुरते बसस्थानक बांधून जागेचा वापर सुरु केलेला होता. दरम्यान सर्व्हे क्र.२२६ येथे नवीन कायमस्वरुपी बसस्थानक बांधून कार्यान्वित करण्यात आल्याने उक्त जागेचा वापर शहर बस वाहतूकीसाठी करण्यात येत होता. तथापि, वाहतूक व बसस्थानकासाठी जाणारा अरुंद रस्ता व त्यामुळे होणारी वाहतूकीची कोंडी यामुळे या बसस्थानकाचा वापर कमी झाला. या जागेसाठी कुंपणभिंत बांधण्याचे काम दोनवेळा हाती घेण्यात आले मात्र स्थानिक लोकांच्या विरोधामुळे सदरचे काम होऊ शकले नाही.

सद्य:स्थितीत या जागेवर स्थानिक लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदरचे अतिक्रमण काढून टाकण्याकरीता पोलीस बळ उपलब्ध करुन न मिळाल्याने अतिक्रमण काढता आलेले नाही. तसेच या जागेवर वक्फ मंडळाने मालकीहक्क दाखवून ही जागा परत मिळण्यासाठी महाराष्ट्र वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे कोर्टामध्ये दावा दाखल असून तो प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील एसटीला शासनाने टोलमाफ केला प्रवासी कर साडेसतरा टक्क्यावरून दहा टक्के केल्याबाबत**

**(२५) ११४२२ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटीला शासनाने टोलमाफ केला प्रवासी कर साडेसतरा टक्क्यावरून दहा टक्के केला शिवाय डिझेलमुळे होणारा तोटा कमी करण्यासाठी डायरेक्ट ऑईल कंपन्यांकडून डिझेलचा होणारा पुरवठा बंद करण्यात आला मात्र बसभाडे तेच ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सर्व सामान्य प्रवाशांची लूट होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०७-२०१५) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला सन २०१३-१४ मध्ये रु. ५८७ कोटी इतका तोटा झाला आहे. तोट्यास कारणीभूत असलेल्या विविध घटकांमध्ये टोलमुळे रा.प. महामंडळावर पडणारा वित्तीय भार हे देखील एक कारण आहे. सन २०१३-१४ मध्ये रा.प. महामंडळाने विविध टोलनाक्यांवर रु. १३२.९९ कोटी इतका टोल भरलेला आहे.

रा.प.महामंडळाने वर्ष २०१२-२०१६ चा कर्मचारी वेतनवाढीचा प्रतिवर्ष ५१४ कोटी याप्रमाणे चार वर्षाचा एकूण आर्थिक भार रु. २०५६ कोटी जनतेवर न टाकता महामंडळाने सोसलेला आहे. त्या तुलनेत डिझेल दर कमी झाल्याची बचत रु. १९१ कोटी इतकी आहे.

दिनांक १६.०२.२०१५ व दिनांक ०१.०३.२०१५ रोजी केंद्र शासनाने डिझेलच्या दरात वाढ केली आहे. सद्यस्थितीत झालेल्या डिझेल दर कपातीपेक्षा कर्मचारी/अधिकारी वेतनवाढ व पथकराची रक्कम याचा आर्थिक भार मोठा आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली (पूर्व) मुंबई येथील नॅन्सी कॉलनी येथील प्रवाश्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा तसेच त्या जमिनीवर राहत असलेल्या मूळ रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२६) ११६७१ (०४-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली (पूर्व) मुंबई येथील नॅन्सी कॉलनी येथील एस.टी बस डेपो च्या संपूर्ण जागेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची प्रशासकीय इमारत उभारून प्रवाश्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा दयाव्यात, तसेच त्या जमिनीवर राहत असलेल्या मूळ रहिवाश्यांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने यावर निर्णय घेतला आहे काय,त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०८-२०१५) :**(१) व (२) सदरचा प्रस्ताव दिनांक ०८.०४.२०१५ रोजी महामंडळाने दहिसर नॅन्सी कॉलनी, बोरीवली येथे बसस्थानक व इतर आस्थापनाकरीता २.५५ हेक्टर जागा भूसंपादित केली आहे. सद्य:स्थितीत येथे तीन मजली इमारत बांधली असून यात चालक/वाहक विश्रांतीगृह व बसस्थानक कार्यान्वित आहे. यामुळे तेथील रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे प्रयोजन नाही. सदर जागेवरील अनाधिकृत झोपड्या

हटविण्याकरीता तसेच पात्र झोपड्यांचे पुनर्वसन याबाबत उपजिल्हधिकारी (अतिक्रमण / निष्कासन) व पोलीस निरीक्षक, बोरिवली यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील अत्यल्प व भूधारक शेतकऱ्यांना निधीची रक्कम न दिल्याबाबत**

**(२७) १२१७७ (०८-०३-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील साडेचार लाख अल्प, अत्यल्प व बहुभूधारक शेतकऱ्यांच्या मदतीसाठीसाठी जिल्हाधिकारी, अमरावती येथील कार्यालयाने दुसऱ्या टप्प्यातील १२५ कोटी ८४ लाखांचा निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे सर्व तालुक्यांना वितरीत केला मात्र ८ जानेवारीला प्राप्त पहिल्या टप्प्यामधील निधीतील रक्कम तालुक्यामधील शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अद्यापही जमा झालेला नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अचलपूर तालुक्यातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सदरहू रक्कम प्राप्त होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.
दि.७.१.२०१५ व दि. २.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत केला आहे. शेतकऱ्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील ४३ गावांचे नदीच्या महापुरामुळे नुकसान झाल्याने पुनर्वसन करण्याबाबत**

**(२८) १२१७९ (०८-०३-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील ४३ गावांचे नदीच्या महापुरामुळे गेल्या ३ वर्षापासुन नुकसान झाल्याने पूरग्रस्त ४३ गावांच्या पुनर्वसनासाठी ४२ कोटी रुपयांच्या शासकीय अनुदानाची आवश्यकता असून आतापर्यंत केवळ १० कोटी एवढाच निधी महाराष्ट्र शासनाकडून पूरग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उर्वरित ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला नसल्यामुळे सदरहू गावांतील पुनर्वसनाचे काम रखडलेले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०५-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्र. आव्याप्र २०११/प्रक्र ९७/आव्यप्र-२ दिनांक ३०/०३/२०१५ अन्वये रुपये ३.४८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कामाचे प्रगतीनुसार पुढील निधी उपलब्ध करुन देण्याची तजबीज आहे.

---

**कयाधू (जि.हिंगोली) नदीचे पुराचे पाणी हिंगोली शहरातील महादेव वाडी, बावनखोली वसाहतीमध्ये शिरत असल्यामुळे या भागातील घरांना पुरापासून धोका निर्माण झाला**

**(२९) १२४६१ (०७-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कयाधू (जि.हिंगोली) नदीचे पुराचे पाणी दरवर्षी हिंगोली शहरातील महादेव वाडी, बावनखोली इत्यादी वसाहतीमध्ये शिरत असल्यामुळे या भागातील घरांना पुरापासुन धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाकडून अद्याप काहीही उपाययोजना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या परिसरात पुरापासून संरक्षण करण्याकरिता शासनाकडून काय उपाययोजना करण्यात येणार आहेत वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०५-२०१५)** :(१) सन २०१४ मधे अतिवृष्टी झाल्यामुळे महादेववाडी भागात १५-२० घरामध्ये व बावनखोली भागात ५-१० घरामध्ये पाणी शिरले होते. नदीचे पाणी केवळ ३ तासात उतरले होते.
(२) व (३) क्षेत्रीय स्तरावरुन प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर योग्य कार्यवाही करण्यात येईल.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एसटी) ने गेल्या काही महिन्यात डिझेल दरवाढीसह, प्रशासकीय खर्च वाढल्याचे सांगत अनेकदा प्रवासी भाड्यात दरवाढ केल्याबाबत**

**(३०) १२५३१ (१०-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एसटी) ने गेल्या काही महिन्यात डिझेल दरवाढीसह, प्रशासकीय खर्च वाढल्याचे सांगत अनेकदा प्रवासी भाड्यात दरवाढ केली परंतु गेल्या चार महिन्यात डिझेलच्या दरात प्रतिलिटर १० रुपयांची घट झाल्यावरही प्रवासी भाडे कमी करण्याच्या हालचाली वरिष्ठ पातळीवर केल्या नाहीत असे दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी प्रवास स्वस्त व सुविधाजनक व्हावा यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०८-२०१५)** :(१) व (२) रा.प.महामंडळाने कामगार करार सन २०१२-१६ करीता सन २०१२-१३ मध्ये रु.५७७.५४ कोटी, सन २०१३-१४ मध्ये रु. ४६२.२९ कोटी, सन २०१४-१५ मध्ये रु.५०४.८१ कोटीचा आर्थिकभार महामंडळावर आहे. महामंडळास सन २०१२-१३ मध्ये रु. ४२८.८३ कोटी, १३-१४ मध्ये रु. ५७२.६५ कोटी व १४-१५ (फेब्रुवारी, २०१५ अखेर) अंदाजित रु. ६४५.०८ कोटी इतका तोटा झालेला आहे. त्या तुलनेत डिझेल दर कमी झाल्याची बचत रु. १९१ कोटी इतकी आहे.

दिनांक १६.०२.२०१५ व दिनांक ०१.०३.२०१५ रोजी केंद्र शासनाने डिझेलच्या दरात वाढ केली आहे. सद्य:स्थितीत झालेल्या डिझेल दर कपातीपेक्षा राज्य परिवहन महामंडळावरील आर्थिक भार मोठा आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जयसिंगपूरातील (जिल्हा कोल्हापूर) आर.टी.ओ.कॅम्प पूर्ववत सुरु करण्याची तसेच भार क्षमता तीन टनापेक्षा जास्त हेवी सर्व गाड्यांचे पासींग सुरु ठेवण्याची मागणी केल्याबाबत**

**(३१) १२९२२ (०८-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जयसिंगपूरातील (जिल्हा कोल्हापूर) आर.टी.ओ.कॅम्प पूर्ववत सुरु करण्याची तसेच भार क्षमता तीन टनापेक्षा जास्त हेवी सर्व गाड्यांचे पासींग सुरु ठेवण्याची मागणी जयहिंद मोटार मालक संघ, जयसिंगपूर यांच्या वतीने प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर, यांच्याकडे निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवट्च्या आठवड्यात वा त्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यांसदर्भात निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२२-०७-२०१५)** :(१) होय,
(२) परिवहन संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण संदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिनांक १० जून, २०१४ रोजी जनहित याचिका क्र. २८/२०१३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार तसेच रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ३ टनापेक्षा जास्त भारक्षमतेच्या अवजड वाहनांची योग्यता प्रमाणपत्र तपासणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली मुख्यालयात केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवसी (जि.गोंदिया) येथे एस.टी डेपो सुरु करण्याबाबत**

**(३२) १२९८९ (०४-०४-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील देवसी बसस्थानक आदिवासी तालुक्यातील प्रमख बसस्थानक आहे, याठिकाणी सकाळ ते संध्याकाळ प्रतिदिन शेकडो बसेसची ये-जा होते, परंतु येथे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचा डेपो नाही, त्यामुळे येथे बसेसचे संचालन नीट होत नाही, त्यामळे येथे शासनानेएस.टी.डेपो सुरु करावी अशी मागणी असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी एस.टी.डेपो सुरु करण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) (i) देवसी येथे एक हेक्टर जागेवर ४ फलाटांचे बसस्थानक असून बसस्थानकावर उपहारगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष, चालक/वाहक विश्रांतीगृह, पार्सल, वाहन तळाचे डांबरीकरण, प्रवाशांकरीता प्रतिक्षालय, आवश्यक लाईट/पंखे, बाकडे, पिण्याचेपाणी, स्त्री/पुरुष प्रवाशांकरीता स्वतंत्र प्रसाधनगृह इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

(ii) देवसी येथील जवळच्या आगाराची नियते व अंतरे पाहता तेथील सध्याच्या फेऱ्या व उपलब्ध सुविधा पाहता, बसस्थानकातील सुविधा पुरेशा आहेत.

(iii) देवसी हे ठिकाण साकोली आगारापासून ३९.७ कि.मी. अंतरावर आहे. देवसी येथून दिवसभरात एकूण १६२ फेऱ्या जाता-येता चालनामध्ये आहेत. सद्य:स्थितीत चालन व प्रवाशी पुरेशा आहेत. म्हणून देवसी येथे नवीन बसआगाराची निर्मिती आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य वाटत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील शेतक-यांचे चुकीचे पीकपेरा महसूल अधिकारी यांनी नोंदविल्याबाबत**

**(३३) १३२८२ (०४-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील शेतक-यांचे चुकीचे पीकपेरा महसूल अधिकारी यांनी नोंदविले असल्यामुळे बागायतदार शेतकरी शेतात ऊस असतानाही पिकपेरा नोंद चुकीची दर्शविली गेल्याने शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकरी यांना देण्यात येणाऱ्या बागायत पिकाच्य अनुदानास पात्र असतानही वंचित राहिले असून सदर वंचित शेतक-यांचे पुनश्च व प्रत्यक्ष जाऊन पिकपेरा नोंद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा नियोजन समितीच्या लातूरच्या बैठकीत दिनांक २७ जानेवारी, २०१५ रोजी पालकमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावराच्या चाऱ्याचा प्रश्न विचारात घेऊन सदर भागाकरिता टंचाई निवारणार्थ रु. ३८९.९८ लक्ष रकमेचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला. तद्नुषंगाने जनावरांसाठी चारा उपलब्ध करणे आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे इत्यादी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिल्लोड ता.जि.औरंगाबाद येथील सिल्लोड बसस्थानक परिसराला घाण, कचरा व त्यामुळे पसरणा-या दुर्गंधीमुळे उकिरड्याची अवकळा**

**(३४) १३२८६ (१०-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन गाड्यामध्ये तसेच बसस्थानकावर घाणीचे साम्राज्य असल्याने सदर दोन्ही ठिकाणी स्वच्छतेसाठी आणि प्रवाशांच्या सोयीसुविधांसाठी तातडीने व्यापक प्रयत्न करण्याचे निर्देश राज्यमंत्री महोदयांनी दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास संबंधित परिवहन अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्देशाप्रमाणे कोणते व्यापक प्रयत्न या संदर्भात करण्यात आले आहेत व येणार आहेत,
(३) सदरील निर्देशाप्रमाणे बसस्थानकामध्ये स्वच्छता व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२८-०७-२०१५) :**(१) हे अशत: खरे आहे.
(२) सिल्लोड बसस्थानकाच्या समोरच्या जागेची स्वच्छात आगाराच्या देखदेखीखाली दैनंदिन केली जाते. बसस्थानकाच्या पाठीमागील भाग दैनंदिन वापरात नाही. त्या ठिकाणी बाहेरील फळवाले, हॉटेलवाले व इतर व्यवसायिक त्यांचा कचरा रात्रीच्या वेळी आणून टाकतात. याबाबत विभाग नियंत्रक, औरंगाबाद व आगार व्यवस्थापक सिल्लोड यांच्यामार्फत पोलिस स्टेशन व नगर पालिकेकडे तक्रार देण्यात आली आहे व बसस्थानकाची नियमितपणे साफसफाई सुरु आहे.

(३) पुर्वीची साफसफाई करणारी संस्था काम करीत नसल्याने त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले असून नविन एजंसी नेमण्यासाठी निविदा उघडण्यात आल्या असून नविन एजंसी अंतिम करुन कार्यादेश देण्याची कार्यवाही राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसघांतील जुळे**
**सोलापूर येथे नवीन बसस्थानक उभारण्याबाबत**

**(३५) १३४७६ (०४-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसघांतील जुळे सोलापूर येथे नवीन बसस्थानक संदर्भात प्रस्ताव आपल्याकडे दाखल असून बस स्थानकाची गरज लक्षात घेता धुळे ,सोलापूर येथे अद्याप बसस्थानक झालेले नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित प्रकरणावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०८-२०१५) :**(१), (२) व (३) जुळे सोलापूर येथे महामंडळाच्या मालकीची जागा नसल्यामुळे विभाग नियंत्रक सोलापूर यांच्याकडून सोलापूर नगर रचना कार्यालयाकडे शासकीय जागा विनामुल्य मिळण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला असता जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाने विनामुल्य जागा मागणीचा विचार शासनाकडून करता येत नसल्याचे दिनांक २२.०१.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.
जुळे, सोलापूर येथे बसस्थानक बांधण्याचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर विचाराधीन असून जागा व निधी उपलब्ध झाल्यास नविन बसस्थानक उभारता येणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामीण भागाप्रमाणेच राज्य परिवहन महामंडळाच्या शहर बसेसमधून**
**सुध्दा जेष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत देण्याबाबत**

**(३६) १३६१९ (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या एस.टी बसेस मधून प्रवाशांसाठी ५० टक्के सवलत देण्याची योजना ही फक्त ग्रामीण भागातील प्रवाशांना देवून शहरी भागातील जेष्ठ नागरीकांवर अन्याय केला जात असल्याबाबत राज्यातील जेष्ठ नागरीकांच्या संघटनेने माहे जानेवारी २०१४ मध्ये वा त्यासुमारास शासनास निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) ग्रामीण भागाप्रमाणेच राज्य परिवहन महामंडळाच्या शहर बसेसमधून सुध्दा जेष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत देण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-०७-२०१५) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २७ जुलै, २००४ अन्वये ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना रा.प. महामंडळाच्या बसेसमधून प्रवासभाड्यात ५०% सवलत देण्यात आली. तथापी, सदर निर्णयात राज्य परिवहन महामंडळातर्फे ज्या महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात नागरी वाहतूक सुरु आहे त्या क्षेत्रांना ही सेवा सध्या लागू करण्यात आलेली नाही.

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना रा.प. महामंडळाच्या शहरी वाहतूकीच्या बसेसमधून ५०% प्रवासभाडे सवलत लागू करणे ही बाब सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीतील असून त्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून सद्य:स्थितीत कोणतीही कार्यवाही सुरु नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिवसा (ता.जि.अमरावती) येथील श्रीक्षेत्र कोंडण्यपुर मे रेस्टारेंट व वाईन बार बंद करण्याबाबत**

**(३७) १३९४७ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (ता.जि.अमरावती) येथील श्रीक्षेत्र कोंडण्यपुर मे रेस्टारेंट व वाईन बार बंद करण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी स्थानिक जिल्हाधिका-यांना निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांना त्रास होत आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०७-०५-२०१५) :**(१) होय.
(२) व (३) शासन अधिसूचना दि.२५.३.२००८ व दि.१२.२.२००९ नुसार मद्य विक्रीची अनुज्ञती बंद करण्याबाबत असलेल्या मार्गदर्शन तत्वाची पुर्तता होत असल्यास आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**अमेरिकन बनावटीच्या बीअरच्या टीनवर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे छायाचित्र छापण्यात आल्याबाबत**

**(३८) १४१५४ (०८-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमेरिकन बनावटीच्या बीअरच्या टीनवर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे छायाचित्र छापण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०५-२०१५) :**(१) राज्यात विक्री होणा-या बिअरच्या टीनवर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे छायाचित्र वापरण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील महिला व नागरिकांकडून कायमची दारूबंदी करणेकरिता**

**(३९) १४४६३ (०८-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील महिला व नागरिकांकडून कायमची दारूबंदी करणेकरिता दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय परभणी येथे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत,

(३) असल्यास,परभणी जिल्ह्यात दारूबंदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०५-२०१५) :**(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहकांविरुध्दच्या सुमारे ५६ हजार तक्रारी प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) १४५९७ (०८-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहकांविरुध्द प्रवाशांकडून भाडे घेऊन तिकीट न देणे, जुन्या तिकीटांची पुन्हा विक्री करणे, कमी रक्कम मिळणे अशा विविध तक्रारींची गेल्या वर्षभरात सुमारे ५६ हजार प्रकरणे विना कार्यवाही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि विविध प्रलंबित तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आजतागायत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२९-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) मागील वर्षभरात भाडे घेऊन तिकीट न देणे २०८६, प्रवासभाडे विनावसूल विनातिकीट ८८८५, कमी दराचे तिकीट ३४६, जुन्या तिकीटांची पुन्हा विक्री करणे ३५, जादा रक्कम मिळणे ४५९५, कमी रक्कम मिळणे ५६८५ अशी एकूण २१६३२ प्रकरणे आढळून आली आहेत. राज्य परिवहन महामंडळाच्या शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार सदर प्रकरणांची खातेनिहाय चौकशी सुरु असून अंतिम कार्यवाही करण्यात येत आहे. दिनांक १५.०३.२०१५ ते ३१.०३.२०१५ पर्यंत महामंडळाची वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या अपराध प्रकरणी निपटारा पंधरवाडा राबविण्यात आला. यामध्ये ८११९ अपराध प्रकरणी निकाली काढण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उखळु पैकी आंबाईवाडा (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील घरे उंच दरडावर बांधल्याबाबत**

**(४१) १४८०६ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उखळु पैकी आंबाईवाडा (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील १५ घरे उंच दरडावर बांधलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घरांना पावसाळ्यामध्ये धोका उदभवण्याबाबत व दुर्घटना घडण्याबाबत तेथील कुटूंबांनी तहसिलदारांना लेखी सुचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कुटूंबाना तात्काळ, अन्यत्र न हलविलेस पावसाळ्यामध्ये दरड कोसळुन दुर्घटना घडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कुटूंबीयांचे स्थलांतर लगतच्या गायरान जमिनीमध्ये करण्याची तसेच त्यांना अर्थिक मदत करण्याची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१८-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) पावसाळ्यामध्ये दरड कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे असा ठराव संबंधित ग्रामपंचायतीमध्ये पारीत करण्यात आला आहे.

(४) संभाव्य दरडग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे प्रचलीत धोरण नाही. तथापि असे सर्वकष धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी भागात एस.टी.बसेसच्या फेऱ्या वाढविण्याबाबत**

**(४२) १५९३१ (०८-०३-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी भागात मर्यादित एस.टी.च्या फे-या असल्यामुळे विद्यार्थ्यांपासून नोकरी करणा-या कर्मचा-यांची फार मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न क्र. १ व २ नुसार डहाणू तालुक्यातील आदिवासी भागात नागरिकांची होणारी गैरसोय पाहता एस.टी.बसेसच्या फेऱ्या वाढविण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-०८-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन डहाणू आगाराकडून प्रवाशांकरीता एकूण ४७ नियते ३९१ फेऱ्या व १४४३६.१ कि.मी. दैनंदिन चालनात आहेत. त्यापैकी २६ नियते ३४७ फेऱ्या व ७४९० कि.मी. डहाणू तालुक्यातील आदिवासी भागातील प्रवाशी वाहतूकीकरिता चालविले जातात. तर उर्वरित नियते, कि.मी. व फेऱ्या या लांब पल्ला, मध्यम लांब पल्ला मार्गावर चालविल्या जातात. डहाणू तालुक्यातील आदिवासी भागात राज्य परिहवन बस सुरु करणेबाबतची मागणी प्रलंबित नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात अल्पसंख्यांक मुलींच्या वसतीगृहाचे अपूर्ण असलेले बांधकाम**

**(४३) १६१३६ (०८-०३-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात अल्पसंख्यांक मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम अपूर्ण असून मुलींच्या वस्तीगृहामध्ये मुस्लिम मुलींना कमी प्रवेश दिले जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शैक्षणिक संस्था, तांत्रिक संस्था व अल्पसंख्यांक समुदाय सामाजिक संघटनांना सहभागी व व्यापक माहिती देऊन प्रवेश प्रक्रिया करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२४-०८-२०१५) :**(१) नाही.
(२) होय, जिल्हाधिकारी स्तरावर आणि प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर यांनी संयुक्तीकरित्या प्रवेशासाठी अथक परिश्रम घेतले आहे. अल्पसंख्यांक विद्यार्थीनीच्या वसतीगृहातील प्रवेशाकरीता सर्व महाविद्यालयांना प्रत्यक्ष पत्र पाठवून कळविण्यात आलेले होते. तसेच स्थानिक वर्तमानपत्रातून जाहिराती प्रसिध्दी करण्यात आल्या आहेत. तसेच शहरात महत्वाच्या ठिकाणी सर्व महाविद्यालयात जाहिरात फलक तसेच फ्लेक्स बोर्ड लावण्यात आले होते. शहरातील प्रतिष्ठीत नागरिक व लोकप्रतिनिधी सोबत बैठकीसुध्दा आयोजित करण्यात आल्यात व पत्रकेही वितरीत करण्यात आले आहेत. परंतु अल्पसंख्याक मुस्लीम विद्यार्थीनींचा प्रतिसाद मिळालेला नाही. वसतीगृहाच्या प्रवेशाकरीता एकही मुस्लीम विद्यार्थीनीचा अर्ज प्राप्त झालेला नाही. दि.२३.२.२०१५ पासून वसतीगृह सुरु करण्यात आले असून वसतीगृहात अल्पसंख्याक (बौध्द) ७, एस.सी.९, एस.टी.-३, एन.टी.२, ओ.बी.सी. ७ व ओपन २ असे एकूण ३० मुलींनी प्रवेश घेतला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी व निरीक्षकांच्या बदल्या करण्यात येऊन फक्त दोन निरीक्षकांची पदे कार्यरत ठेवण्यातआल्याबाबत**

**(४४) १८०१३ (०६-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागातील अधिकारी व निरीक्षकांच्या दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये औरंगाबाद परिवहन विभागातील ७ निरीक्षकांच्या बदल्या करण्यात येऊन फक्त दोन निरीक्षकांची पदे कार्यरत ठेवण्यात आली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद परिवहन विभागात रिक्त असलेल्या परिवहन निरीक्षकांच्या पदांमुळे वाहन चालकांना वेळेवर परवाने मिळणे, वाहनांची तपासणी करणे या कामात अडथळे निर्माण झाल्याने वाहनचालक व मालकांनी विभागीय परिवहन आयुक्त यांचेकडे रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याबाबत लेखी मागणीही माहे एप्रिल, २०१५ वा त्या दरम्यान सातत्याने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-१०-२०१५) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
तथापि शासन आदेश दिनांक १६.४.२०१५ अन्वये प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथून ७ मोटार वाहन निरिक्षकांची बदली झाली असून, त्या ऐवजी २ मोटार वाहन निरिक्षक देण्यात आले आहेत.

(३) व (४) शासनाने दिनांक ३१.०८.२०१५ च्या आदेशान्वये २९ सहाय्यक मोटार वाहन निरिक्षकांना मोटार वाहन निरीक्षक या संवर्गात पदोन्नती दिली असून त्यापैकी प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे १० मोटार वाहन निरीक्षकांची पदस्थापना करण्यात आली आहे.

---

**येवला येथील बसस्थानक आणि आगार व्यवस्थापक निवासस्थानासह व्यापार संकुल बांधण्याच्या बी.ओ.टी तत्वावरील कामास शासनाने मंजुरी देवूनही सदर काम सुरु न झाल्याबाबत**

**(४५) १८२८० (१२-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला येथील बसस्थानक आणि आगार व्यवस्थापक निवासस्थानासह व्यापारी संकुल बांधण्याच्या बी.ओ.टी तत्वावरील कामास शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी मंजुरी देवूनही माहे मे, २०१५ पर्यंत सदर काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बसस्थानकाची अत्यंत दुरवस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी या स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम तातडीने हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी शासनाने मंजुरी दिलेले काम तातडीने सुरु करण्यासाठी तसेच, बी.ओ.टी. तत्वावर सदर काम न करण्याबाबतचा शासनाचा विचार असल्यास प्रश्न भाग (१) व (२) मधील कामासाठी शासनस्तरावरुन अनुदान मंजुर करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-११-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.०४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सादर केलेले पत्र रर.प.महामंडळास प्राप्त झालेले आहे. योवला येथील बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) बस स्थानकांसंदर्भात छोट्या गाळा धारकांची बांधकामे पाडण्याची कारवाई सुरु करण्यात आली होती. त्याचवेळ हिवाळी अधिवेशन-२०१४ मध्ये स्थानिक विधान सभा सदस्य व प्रश्नकर्ते यांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन सदरील प्रकरणी तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) येथील एस.टी. स्थानकाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४६) १९०४५ (११-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील एस.टी. स्थानकाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एस.टी. स्थानकाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर एस.टी.स्थानकाची दुरवस्था सुधारुन प्रवाशांना सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-११-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे,

शहापूर बसस्थानकाची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली ही बाब पुर्णत: सत्य नसून बसस्थानकाची मोठया प्रमणात दुरवस्था झाली ही बाब पुर्णत: सत्य नसून बसस्थानकाच्या छताच्या काही भागातून पावसाच्या पाण्याची गळती होत आहे, तसेच बसस्थानकाच्या गेट जवळ पावसामुळे खड्डे पडले आहेत,

(२) व (३) बसस्थानकाचे वाहनतळ, प्रसाधनगृह, सुस्थितीत असून प्रवाशांना बसस्थानकात बसण्यासाठी आसन व्यवस्था, पिण्याची पाणी लाईट, पंखे, तिकिट आरक्षण व्यवस्था इ. सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या असून बसस्थानकाच्या छताच्या काही भागातून पावसाच्या पाण्याची गळती रोखण्याची व गेटजवळ पडलेले काही खड्डे भरुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे,

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालाड (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्गावर (मुंबई उपनगर) राज्य परिवहन मंडळाच्या बसचा थांबा व निवारा शेड उभारण्याबाबत**

**(४७) २०६३६ (१२-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्गावर (मुंबई उपनगर) राज्य परिवहन मंडळाच्या बसचा थांबा व निवारा शेड उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.परिवहन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना एक लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड (पूर्व) पश्चिम द्रुतगती मार्गावर (मुंबई उपनगर) राज्य परिवहन मंडळाच्या बसचा थांबा व निवारा शेड उभारण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) बोरिवली येथून सुटणाऱ्या सर्व बसेसना पश्चिम द्रुतगती मार्गावरील सर्व रा.प. थांब्याच्या ठिकाणी प्रवाशी चढ/उतार करण्याच्या सूचना संबंधित सर्व आगारांना देण्यात आल्या आहेत. मालाड (पुष्पापार्क) येथे अद्यावत पिकअपशेड बांधण्यात आला आहे व या थांब्याचा समावेश संगणकीय आरक्षण प्रणालीमध्ये करण्यात आला असून येथून प्रवाशी चढ/उतार करण्यात येते. तसेच सदर मार्गावरील सर्व थांब्याची माहिती असणारा आद्यावत भव्य फलक बोरिवली नॅन्सी, बोरिवली सुकुरवाडी, नेहरुनगर व पनवेल या बसस्थानकांवर प्रवाशांच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात सुमारे तीस हजार वाहनचालकांना आर.सी.पुस्तकास पर्याय असलेले स्मार्ट कार्ड देण्याबाबत**

**(४८) २२०३२ (०६-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन विभागाकडून गेल्या काही महिन्यापासून स्मार्ट कार्ड बनवून देण्याऱ्या ठेकेदाराचे काम काढून घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे कोल्हापूर जिल्हयात सुमारे तीस हजार वाहनचालकांना आर.सी. पुस्तकास पर्याय असलेले स्मार्ट कार्ड देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन विभागाच्या मंद कारभारामुळे ३० हजार स्मार्ट कार्ड प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे ,
(५) असल्यास, चौकशीअंती कोल्हापूर जिल्हयात सुमारे तीस हजार वाहनचालकांना आर.सी. पुस्ताकास पर्याय असलेले स्मार्ट कार्ड देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१५)** :(१) होय.
दि.२६.११.२०१४ पासून स्मार्ट कार्ड सेवा पुरवठादाराच्या सेवा समाप्त करुन वाहन नोंदणी प्रमाणपत्रे जारी करण्याचे कार्य परिवहन विभागामार्फतच करण्यात येत आहे.

(२) दि. २७.११.२०१४ नंतर नोंदणी झालेल्या वाहनांना स्मार्ट कार्ड ऐवजी पुर्वमुद्रीत स्टेशनरीचा वापर करुन नोंदणीपत्रे जार केली जातात.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) वाहन मालकांना स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्र जारी करण्यास्तव नवीन सेवापुरवठादार निवडीसंदर्भात दि. २६.८.२०१५ रोजी ई.निविदा प्रक्रिया जारी करण्यात आली.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सध्या मुंबई व उपनगरातील दुचाकी व चारचाकीच्या परवाना नुतनीकरण तसेच वाहन नोंदणी प्रमाणपत्रासाठी सध्या चालकांना ३० ते ४० दिवसांची प्रतीक्षा करावी लागत असल्याबाबत**

**(४९) २५२३७ (११-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व उपनगरातील दुचाकी व चारचाकीच्या परवाना नुतनीकरण तसेच वाहन नोंदणी प्रमाणपत्रासाठी सध्या चालकांना ३० ते ४० दिवसांची प्रतीक्षा करावी लागत आहे, असे दिनांक ७ जून, २०१५ व त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यसा, अपुरे कर्मचारी आणि गेल्या काही महिन्यापासून स्मार्टकार्ड पुरवणाऱ्या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरसी बुक साठी ३० ते ४० दिवसांची प्रतिक्षा करावी लागत असल्याने जनतेमध्ये असंतोष पसरला आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) होय.
दिनांक २७.११.२०१४ पासून स्मार्ट कार्ड पुरविणाऱ्या सेवा पुरवठादारासोबतचा करार संपुष्टात आल्याने सेवा बंद करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
मुंबई विभागात नोंदणी प्रमाणपत्र जारी करण्यासाठी सरासरी १५ दिवसांचा कालावधी लागत आहे.
(४) मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास्तव आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच स्मार्ट कार्ड नोंदणी प्रमाणपत्रासाठी निविदाप्रक्रिया जारी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे परिवहन कार्यालयांतर्गत ऑनलाईन शिकाऊ वाहन परवाना यंत्रणेत गेली आठ महिन्यापासून सिस्टिम सर्व्हर बंद पडण्या बरोबरच अनेक त्रुटी असल्याबाबत**

**(५०) २६६९३ (१२-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे परिवहन कार्यालयांतर्गत ऑनलाईन शिकाऊ वाहन परवाना यंत्रणेत गेली आठ महिन्यापासून सिस्टिम सर्व्हर बंद पडण्या बरोबरच अनेक त्रुटी असल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या यंत्रणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शिकाऊ वाहनपरवाना काढण्याचा स्टॉल बंद पडण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीसाठी कार्यरत असणारी स्टॉल ही संगणक प्रणाली दि.०५.०६.२०१५ रोजी दुपारनंतर तांत्रिक बिघाडामुळे केवळ काही काळाकरिता बंद पडली होती.

(२) होय.

शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी अपॉईंटमेंट सक्तीची करण्याविरोधात मा.उच्च न्यायालय, नागपूर येथे आव्हान याचिका क्र.२०२८/२०१५ दाखल करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायलय, नागपूर येथे शासनातर्फे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.